संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# कर्जमाफी विषयाचे राजकीयकरण

**शेतकऱ्यांची** कर्जमुक्ती किंवा कर्जमाफी हा जेव्हा राजकीय मुद्दा होतो, त्यावेळेला कोणालाही मनापासून शेतकरी कर्जमुक्त व्हावा, असे वाटत नाही हे सिध्द होते. गेल्या आठवडाभरापासून विधीमंडळ अधिवेशनात शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवरून गदारोळ सुरू आहे. महापालिका निवडणुकीपूर्वी शिवसेनेने सरकारकडे शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा आग्रह धरला होता. काँग्रेसलादेखील राजकारणासाठी हा मुद्दा सोयीचा वाटला. या एका मुद्यावरून शिवसेनेच्या मागणीचे समर्थन करायचे. किंबहुना वेळ पडली तर आक्रमक व्हायचे, असा पवित्रा काँग्रेसने घेतला आणि शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या निर्णयाशिवाय अधिवेशन चालू देणार नाही, अशा प्रकारची भूमिका घेतली. दरम्यान, शिवसेनेच्या मंत्र्यांनीदेखील मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन कर्जमाफीचा पुन्हा आग्रह धरला आहे. अशा परिस्थितीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कर्जमाफी द्यायला नकार दर्शवला. त्यांचे म्हणणे असे आहे की, कर्जमाफीमुळे शेतकऱ्यांची मूळ समस्या सुटणार नाही. शेतकरी वारंवार कर्जाच्या बेड्यात का अडकतो, याचा विचार करावा लागेल. तोट्यात चालणारी त्यांची शेती फायद्यात कशी येईल. अशा योजनांची जर मांडणी केली तर शेतकऱ्याला वारंवार कर्जमाफी देण्याची वेळ येणार नाही, असा अगदी फडणवीस थाटाचा पांडित्यपूर्ण युक्तिवाद मुख्यमंत्र्यांनी केलेला आहे. परंतु शेतकऱ्यांसाठी आतापर्यंत जाहीर झालेल्या योजना यशस्वी होऊ शकलेल्या नाहीत. जिथे शेतकऱ्यांची शेती फायद्यात आणून देण्याचा प्रयत्न सरकारमधले कारभारी यशस्वी होऊ देतील, यावर विश्वास ठेवता येत नाही. बऱ्याच वेळेला कर्जमाफी की कर्जमुक्ती असाही प्रश्न मांडला जातो. शेतकऱ्याला कायमस्वरूपी कर्जमुक्त करायचे. म्हणजेच त्याच्या शेतीला नफ्यामध्ये आणायचे हाच त्यावरचा पर्याय राहतो. परंतु आजच्या परिस्थितीत शेती फायद्यात आणायची म्हणजे नेमके काय करायचे, याचा कोणताही आराखडा सरकारकडे नाही. म्हणजेच कर्जमुक्तीही नाही आणि कर्जमाफीही नाही. अशा कात्रीमध्ये शेतकरी सापडलेला आहे. सावकाराचे कर्ज, बँकांचे कर्ज त्याला फेडता येत नाही. पुन्हा वारंवार येणाऱ्या नैसर्गिक संकटांना तोंड द्यावे लागते. कधी अवकाळी पाऊस तर कधी अतिउष्णतेची लाट कधी अतिवृष्टी, तर कधी गारपीट, अशा काही ना काही समस्यांमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत राहते. त्यातही सामान्य स्वरूपाचा शेतकरी मोठ्या प्रमाणावर भरडला जातो आणि मग शेतकऱ्यांच्या या समस्येचे वर्षानुवर्षे राजकारण केले जाते. आतादेखील तोच प्रकार सुरू आहे. उपकाराची भावना ठेवून सरकार शेतकऱ्याला आपल्या अंकीत ठेवण्याचा प्रयत्न होत असतो.

**अरुंधतीबाईंची अनाठायी विधाने**

यातला गंभीर भाग असा की, शेतकऱ्यांची ही समस्या कोणीही नीट समजून घेत नाही आणि त्या तज्ज्ञांनी ती समजून घेतली आहे. त्यांचे मार्गदर्शन घेतले जात नाही. उलट शेतकरी हा चेष्टेचा विषय केला जातो. राजकारण्यांना वाटणारे शेतकऱ्यांविषयीचे बेगडी प्रेम सर्वश्रुत आहेच. परंतु त्यात देशातील सर्वात मोठी बँक असलेल्या स्टेट बँकेच्या अध्यक्षांनी भर घातलेली दिसते. शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली जाऊ नये. जर त्यांना कर्जमाफी दिली तर ते पुन्हा दुसऱ्या कर्जमाफीसाठी वाट बघत बसतील. अशा प्रकारचे विधान करून स्टेट बँकेच्या अध्यक्षा अरुंधती भट्टाचार्य यांनी शेतकऱ्यांची खिल्लीच उडवलेली दिसून येते. शेतकऱ्यांना कर्जमाफी देताना बँकांच्या पोटात दुखणं स्वाभाविक आहे. कारण शेतकरी हा सामान्य नागरिक असतो. बँकवाल्यांना शेतकऱ्यांकडून कोणतीही राजदरबारी वागणूक मिळत नाही. याउलट भांडवलदारांनी व्यापाऱ्यांना कितीही कर्ज पुरवले तरी यांना त्याचे काहीही वाटत नाही. एकट्या विजय मल्ल्या या दारू सम्राटाने स्टेट बँकेचे सात हजार कोटी रुपये बुडवले आहेत. वेगवेगळ्या उद्योगपतींनी देशातील बँकांचे दीड लाख कोटींचे कर्ज अक्षरशः लुटलेले आहे. ज्या बुडित कर्जाच्या वसुलीबाबत अरुंधतीबाईंनी कधीही विधान केलेले आढळत नाही. कारण उद्योगपती आणि भांडवलदारांकडून बँक अध्यक्षांना मिळालेल्या वागणुकीची सगळ्यांनाच कल्पना असते. कर्जबुडवे उद्योगपती यांना चालतात. तीस चाळीस हजार कोटींची कर्जमाफी मागणारा शेतकरी मात्र चालत नाही. ही शेतकऱ्यांची मस्करीच ठरते. अरुंधती भट्टाचार्य यांनी जबाबदारीने विधान केले पाहिजे. खरे तर त्यांनी शेतकऱ्यांची माफी मागितली पाहिजे. त्या शेतकऱ्यांच्या मदतीसाठी आपण काही करू शकत नाही. तर मग त्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा उद्योग करू नये.